दैनिक देशोन्नती- 15 ऑक्टोबर,2023

# विद्यापिठात सायबर सुरक्षेबाबत जागृती

देशोन्नती वृत्तसंकलन...

**जळगाव** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकक शास्त्र प्रशाळा व क्विक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पी.एम. मुंदडे माध्यमिक विद्यालय, जळगाव येथील ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षे संदर्भात माहिती देतांना संगणक प्रशाळेतील विद्यार्थी सचिन पाटील व मयुर बंडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली. यावेळी जळगाव येथील सायबर क्राईम विभागातील पोलिस कर्मचारी अरविंद वानखडे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक कुमावत, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.